**सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक या विद्यापीठातंर्गत नवीन महाविद्यालय विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२२९/१७)/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१७

<u>संदर्भ</u> : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी-२०१०/(१९३/१०) /मशि-४, दि. ३०.१०.२०१०.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी-२०१२/(२४७/१२) /मशि-४, दि. ०२.०९.२०१३.
३) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम, १९९७.

राज्यामध्ये संस्कृत भाषेचा विकास होण्याकरिता शासनाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम १९९७ अंमलात आणलेला आहे. नवीन महाविद्यालये (पारंपारिक व व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्या मंजुरीसाठी संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात येत होती. तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंमलात आल्यामुळे संदर्भाधिन शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आले आहेत. त्यामुळे तसेच, या विद्यापीठाकरिता व त्यांच्या अधिनस्त महाविद्यालयांकडून शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढीसाठी बदलत्या परिस्थितीत आवश्यक असलेल्या अनेक महत्वपूर्ण बाबींकडे अधिक लक्ष पुरविणे गरजेचे असल्याने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये (पारंपारिक व व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्या मंजुरीसाठी अर्ज मागविण्याची सुधारित कार्यपद्धती व त्यासंदर्भातील निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

१. कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम १९९७ अंतर्गत सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये (पारंपारिक व व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्यांना मंजुरी देण्यासाठी पुढे विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१.१ विद्यापीठाने त्याच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी "कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम १९९७" च्या कलम ६२ मधील तरतुदीनुसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ विद्यापीठाने पाच वर्षाचा बृहत आराखडा तयार करावा. त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानुसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढीच महाविद्यालये (व्यावसायिक (AICTE व NCTE मंजुरी देत असलेले अभ्यासक्रम सोडून सर्व) व पारंपारिक) मंजुरीच्या प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना शासनाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन महाविद्यालये (पारंपारिक व व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्या सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठी नवीन महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्यांचे प्रस्ताव अधिनियमातील तरतुदीनुसार ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी मागविण्यात व स्वीकारण्यात यावेत.

१.६ नवीन महाविद्यालये (पारंपारिक व व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्या सुरु करण्यास इच्छूक संस्थांनी "कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम १९९७ मधील कलम ६२(३) मधील तरतुदीनुसार ह्या सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमुन्यात विद्यापीठाकडे अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट "ब"मध्ये नमूद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१.७ विद्यापीठाने ऑनलाईन (Online) पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत. अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडण्यात येणाऱ्या आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एक तपशीलसूची तयार करुन त्याप्रमाणे आवश्यक बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्वीकारावेत. विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली नसेल, तर विद्यापीठाने एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणक प्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

१.८ विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरिता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार व या शासनान्वये विहित करण्यात आलेल्या निकषानुसार करुन नियोजन विकास मंडळ अहवाल कुलगुरुंना सादर करतील.

१.१० ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास, त्या संस्थेस/ अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल नियोजन विकास मंडळ यांना सादर करण्यात येईल.

१.१३ विद्यापीठाचे कुलगुरु विद्यापीठ स्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांचा अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ज्ञ समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-ब मध्ये विहित करण्यात आलेल्या सूचीनुसार संबंधित संस्थेची तयारी आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परीक्षण करुन त्याचा अहवाल व्हीडीओ छायाचित्रणासह नियोजन विकास मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल. विहित केलेले निकष पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठ करणार नाही.

१.१४ वरील परि-१.८ मध्ये विहित केलेली छाननी समती व परि- १.१३ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या विद्यापीठाने त्या त्यावर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकडी यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल, याची खातरजमा करतील.

१.१५ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१६ अपात्रता कळविलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपील दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) कुलगुरु निर्णय देतील.

१.१७ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट-ब व प्रपत्र-ब व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक ३१ डिसेंबरपर्यंत सादर करण्यात येतील.

१.१८ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासनाकडून १५ जूनपर्यंत परवानगी कळविण्यात येईल.

२. ज्या संस्था, वरीलप्रमाणे नवीन महाविद्यालये (पारंपारिक व व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्यांना मंजुरीसाठी अर्ज सादर करतील व ज्यांची यापूर्वीच महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारस करु नयेत.

२.१ पात्र महाविद्यालयांचे बाबतीत नॅक / एनबी कडून मानांकन तसेच पूनर्मानांकन करुन घेतले नसेल तर;

परंतु ज्या महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन / पूनर्मूल्यांकन होऊ शकलेले नाही, अशा महाविद्यालयांची या संदर्भातील लेखी कारणे नमूद करुन त्यांचे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत.

२.२ ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यांसहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर,

३. नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकडी सुरु करण्यास देण्यात येणारी मान्यता ही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

४. विद्यापीठाने शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन महाविद्यालय, विद्याशाखा अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्या असे वर्गीकरण केलेले असेल.

५. शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणारे प्रस्ताव विद्यापीठाने शिफारशीत करु नयेत, विद्यापीठाने सकारात्मक शिफारस करुनही अंतिम मान्यता प्राप्त न झाल्याच्या कारणासतव अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात त्यामुळे निकषांची व सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे प्रस्ताव शिफारशित होतील, याची दक्षता विद्यापीठाने घ्यावी. अशी पूर्तता न करणारे प्रस्ताव प्राप्त झाल्यास याची जबाबदारी विद्यापीठाची पर्यायाने संचालक, नियोजन विकास मंडळ यांची राहील.

६. ज्या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य आहे. संलग्निकरण किंवा इतर कारणांमुळे परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे नवीन महाविद्यालय त्या शैक्षणिक वर्षात सुरु होऊ शकले नाही, तर त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक अधिनियम १९९७ अंतर्गत संस्कृत भाषेचा विकास होण्याच्यादृष्टीने विशिष्ट अशा अभ्यासक्रमांना व नवीन महाविद्यालयांना मान्यता

देणे अभिप्रेत असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंतर्गत येणाऱ्या पारंपारिक व व्यावसायिक विद्याशाखांच्या अभ्यासक्रमांची शिफारस करण्यात येऊ नये.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१७१०१२१५१४०२९७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Vasantrao kharke

Digitally signed by Dattatray Vasantrao kharke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d598800beb5ed37ae09d78fff0592182712 3426ec3977a7476478ce183be979d, cn=Dattatray Vasantrao kharke
Date: 2017.10.12 16:55:02 +05'30'

**( द.व.खारके )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महासंचालक, माहिती व जन संपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
९) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
१०) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव.
११) सह सचिव (विशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहायक.
१३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१४) विशि-३, विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
१५) निवडनस्ती - मशि-४.

**शासन निर्णय एनजीसी २०१७/(२२९/१७)/मशि-४, दि.१२ ऑक्टोबर, २०१७.**

*** परिशिष्ट-अ ***

**नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी**

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :<br>(दुरध्वनी क्रमांकासह) | |
| २. | महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता : | |
| ३. | ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाची आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या : | |
| ४. | नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाचे सत्र : | |
| ५. | अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी अस्तित्वात असल्यास त्याचा तपशील (मूळ तुकडी अनुदानावर असेल, तर तसा स्पष्ट उल्लेख करावा) : | |

| | ✓ | **विषय** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|---|
| **विद्याशाखा** | | | |
| **अभ्यासक्रम** | | | |
| **विषय** | | | |
| **तुकडी** | | | |

| | |
|---|---|
| ६. | आवेदन शुल्क रुपये-----/-, धनाकर्ष क्र.---------------<br>दिनांक ------------------ बँकेचे नाव--------------------<br>(धनाकर्ष कुलसचिव,-----------------------विद्यापीठ, यांचे नावे असावा.) |
| ७. | नविन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाच्या विद्याशाखेचा तपशिल : |

| **अ. क्र.** | **शाखा** | **तुकड्यांचा प्रकार (अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित)** | **अभ्यासक्रम** | **अध्यापनाचे माध्यम** | **अध्यापनाचे विषय** |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |

| | |
|---|---|
| ८. | संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक --------व दिनांक ----------- |
| ९. | संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतूद असल्यास, त्या तरतुदींच्या कलम क्र. व तद्नुसार नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र.----- व दिनांक -------- |
| १०. | महाविद्यालयात सुरु करणार असलेल्या प्रस्तावित ठिकाणी तसेच, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास, मागील ०३ वर्षाचा नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडीच्या वस्तुस्थितीचा महाविद्यालयांच्या नावासह तपशील :<br>(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळ्या कागदावर पुरविण्यात यावी.) |
| ११. | आपण सुरु करणार असलेल्या नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडीमुळे व उल्लेखित परिसरातील इतर महाविद्यालयाशी अवास्तव स्पर्धा निर्माण होईल काय ? ------------------------ |
| १२. | निरनिराळ्या विद्याशाखांच्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छूक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या : |

| **वेदविद्या** | **संस्कृत तथा संस्कृती भाषा** | **भारतीय धर्म तत्वज्ञान तथा संस्कृती** | **प्राचिन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र** | **संकीर्ण विद्याशाखा** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

<table>
<tr><td>१३.</td><td>१५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी :
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>शाळेचे /कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता</th><th>वर्ष</th><th>उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या</th><th>उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी</th></tr>
<tr><td>१.</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१४.</td><td>नवीन महाविद्यालय, अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परीक्षेचे केंद्र आहे काय ? -------------------------------</td></tr>
<tr><td>१५.</td><td>केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या ----------------------------------------------------</td></tr>
<tr><td>१६.</td><td>अ) संस्थेद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशील मुळ दिनांकाच्या मान्यतेसह नमूद करावा -----------------------<br>ब) सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परीक्षेस बसलेले विद्यार्थी ------------</td></tr>
<tr><td>१७.</td><td>अ) महाविद्यालयासाठी वापरल्या जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार --------------<br>ब) सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? ------------- ------- असल्यास त्याचा तपशील -------------------------</td></tr>
<tr><td>१८.</td><td>अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती :-<br>(अ) स्थावर मालमत्ता<br>(ब) जंगम मालमत्ता<br>(क) बँकेतील रोख<br>(ड) बँकेचे वा इतर कर्ज</td></tr>
<tr><td>१९.</td><td>वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीचा तपशील : ----------------------------------------------------------------------</td></tr>
</table>

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**अध्यक्ष**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**सचिव**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

## शासन निर्णय एनजीसी २०१७/(२२९/१७)/मशि-४, दि.१२ ऑक्टोबर, २०१७.

*** परिशिष्ट-ब ***

**संस्थेचे नाव :-** **विद्यापीठाचे नाव :**

**ठिकाण :-** **विद्याशाखा :-**

| अ.क्र. | तपासणी सूची | पुर्ततेचा "तपशील" (होय/नाही) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ४. | घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | | |
| ६. | संस्थेच्या फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत.<br>नवीन महाविद्यालय - रु. १,००,०००/-<br>नवीन अभ्यास पाठ्यक्रम - रु. ५०,०००/-<br>विषय - रु. २५,०००/-<br>विद्याशाखा - रु. ५०,०००/-<br>अतिरीक्त तुकडी - रु. २५,०००/- | | |
| ७. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ८. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पुर्व परवानगीशिवाय न काढणेबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विनाअनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु.१००/- स्टँपपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | **१) स्वत:ची जागा -**<br>**अ)** "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १०,००० चौ.फुट अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>ब) "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान २०,००० चौ.फुट अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत.<br>**२) भाड्याची जागा -**<br>**अ)** "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिक क्षेत्रामध्ये १०,००० चौ.फुट अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची " प्रत. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान २०,००० चौ.फुट अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची " प्रत.<br>क) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या "नोंदणीकृत कराराची " प्रत. | | |
| ११. | **अ) इमारत (स्वत:ची)** - संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे. (सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील जोडला आहे, तो खालील रकान्यात त्यांच्या नावासमोर नमूद करावा. तसेच, वर्ग खोल्यांची संख्याही नमूद करावी.) | | |
| | **१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत :** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष<br>१.२ कार्यालय<br>१.३ प्रयोगशाळा<br>१.४ ग्रंथालय<br>१.५ एन.सी.सी.रुम<br>१.६ एन.एस.एस.रुम<br>१.७ नॅक रुम<br>१.८ लेडीज रुम<br>१.९ स्टाफ रुम<br>१.१० रेकॉर्ड रुम<br>१.११ सभागृह<br>१.१२ मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१३ स्वच्छतागृह (२० विद्यार्थ्यांमागे ०१ स्वच्छतागृह) महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व प्रसाधने<br>१.१४ व्हरांडा<br>१.१५ वाहनतळ (दुचाकी वाहनांसाठी) | | |
| | **२) २.१ पाणी सुविधा (पाणीपट्टी पावती)** | | |
| | **२.२ वीज सुविधा (वीज देयकाची प्रत)** | | |
| | **२.३** ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र) | | |
| | ३) होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | |
| | **ब) इमारत भाड्याची** : (नोंदणीकृत भाडेकरार) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे.<br>(सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये सर्वसाधारण वर्गखोली व इतर क्षेत्रफळाचा तपशिल जोडला आहे, तो खालील रकान्यात त्यांच्या नावासमोर नमूद करावा. तसेच, वर्ग खोल्यांची संख्याही नमूद करावी.) | | |
| | **१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत :** | | |
| | १.१ प्राचार्य कक्ष<br>१.२ कार्यालय | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १.३ प्रयोगशाळा<br>१.४ ग्रंथालय<br>१.५ एन.सी.सी.रुम<br>१.६ एन.एस.एस.रुम<br>१.७ नॅक रुम<br>१.८ लेडीज रुम<br>१.९ स्टाफ रुम<br>१.१० रेकॉर्ड रुम<br>१.११ सभागृह<br>१.१२ मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१३ स्वच्छतागृह (२० विद्यार्थ्यांमागे ०१ स्वच्छतागृह) महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व प्रसाधने<br>१.१४ व्हरांडा<br>१.१५ वाहनतळ (दुचाकी वाहनांसाठी) | | |
| | **२) २.१ पाणी सुविधा (पाणीपट्टी पावती)** | | |
| | **२.२ वीज सुविधा (वीज देयकाची प्रत)** | | |
| | **२.३ ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र)** | | |
| | ३) होस्टेल सुविधा / परिसरात २० टक्के विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र | | |
| १२. | १२(अ) व (ब) मधील (१) व (२) साठी फर्निचर किंवा त्यासाठी किमान रु.१.०० लक्ष शिल्लक असल्याबाबतचा पुरावा. | | |
| १३. | नवीन महाविद्यालय, पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाचा आहे ग्रंथालयात पुस्तकाची सुविधा<br>(किमान १०० पुस्तके प्रत्यक्षात हवीत) | | |
| १४. | प्रथमत: महाविद्यालय भाड्याच्या इमारतीत सुरु केले असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे, त्या ठिकाणी स्वत:चे इमारतीमध्ये स्थलांतरीत करत असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १५. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ज्या संस्थेची यापुर्वीचे महाविद्यालय अस्तित्वात आहे अशा संस्थेने नवीन महाविद्यालयाची मागणी केल्यास पूर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक/एनबीए मूल्यांकन अथवा पूनर्मूल्यांकन असणे आवश्यक आहे. | | |

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२२९/१७)/मशि-४, दि. १२ ऑक्टोबर, २०१७.

## प्रपत्र-अ

## कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ. क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकूण क्षेत्र | वेद विद्या/संस्कृत तथा संस्कृतत्तर भाषा/ भारतीय धर्म तत्वज्ञान तथा संस्कृती/प्रचिन भारतीय विज्ञान तथा मानवशास्त्र विद्याशाखा | संकीर्ण विद्याशाखा | संकीर्ण विद्याशाखेंतर्गत येणारा बी.एस्सी हॉस्पीटॅलीटी अभ्यासक्रमाकरीता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | नग | एकूण क्षेत्र | बी.एस्सी. हॉस्पीटॅलीटी |
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०X२० | ४०० | ४०० | ४०० | १ | ४०० | ४०० |
| २) | कार्यालय | १ | २०X२० | ४०० | ४०० | ४०० | १ | ४०० | ४०० |
| ३) | प्रयोगशाळा | १ | २०X२० | ६०० | ६०० | ६०० | - | १२०० | १२०० |
| ४) | ग्रंथालय | २ | ३०X२० | ६०० | १२०० | १२०० | - | १२०० | १२०० |
| ५) | एन.सी.सी. रुम | १ | २०X१० | २०० | २०० | २०० | १ | २०० | २०० |
| ६) | एन.एस.एस.रुम | १ | २०X१० | २०० | २०० | २०० | १ | २०० | २०० |
| ७) | नॅक रुम | १ | १०X१५ | १५० | १५० | १५० | १ | १५० | १५० |
| ८) | लेडीज रुम | १ | १०X१५ | १५० | १५० | १५० | १ | १५० | १५० |
| ९) | स्टाफ रूम | १ | २०X३० | ६०० | ६०० | ६०० | १ | ६०० | ६०० |
| १०) | रेकॉर्ड रुम | १ | १५X१० | १५० | १५० | १५० | १ | १५० | १५० |
| ११) | सभागृह | १ | ४०X३० | १२०० | १२०० | १२०० | १ | १२०० | १२०० |
| १२) | मोठे व्याख्यान कक्ष | ३ | ३०X३० | ९०० | २७०० | २७०० | ३ | २७०० | २७०० |
| १३) | टॉयलेट ब्लॉक | २ | १५X२० | ३०० | ६०० | ६०० | २ | ६०० | ६०० |
| १४) | व्हरांडा | १ | --- | १००० | १००० | १००० | १ | १००० | १००० |
| | **एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ)** | | | **६,८५०** | **९,५५०** | **९,५५०** | | **१०,१५०** | **१०,१५०** |

* व्यावसायिक महाविद्यालयासाठी स्वतंत्र केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.

## शासन निर्णय एनजीसी २०१७/(२२९/१७)/मशि-४, दि.१२ ऑक्टोबर, २०१७.

### *प्रपत्र-ब*

| क्र. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | प्रस्तावित नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी विद्याशाखेचा तपशिल | विद्यापीठांनी केलेली शिफारस | संस्थेने महाविद्यालयांसाठी आवश्यक विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या मुलभूत सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय? असल्यास, त्याचा तपशिल | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे. | ज्या तालुक्यामधील महाविद्यालयात नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी मागितली आहे त्या तालुक्यातील महाविद्यालयात अस्तित्वात असणाऱ्या नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडीवर विपरित परिणाम होईल किंवा कसे, | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालयांमधील अंतर | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांतील विद्याशाखेंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या विषयाचे गट (व्यावसायिक अभ्यासक्रमांची स्वतंत्र माहिती द्यावी) | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायिक अभ्यासक्रमाची स्वतंत्र माहिती द्यावी | तालुक्यामध्ये महाविद्यालय शाळांमधुन १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखा निहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागील वर्षी किती विद्यार्थी नविन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी प्रवेशापासून वंचित राहिले | नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | १.<br>२.<br>३.<br>४.<br>५. | | | | | | | | |

सुचना : संस्थेने रकाना क्र.४, ५ व १३ सोडून इतर माहिती अचूक भरावी. त्यातील चुकांची जबाबदारी संस्थेची राहील.

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष
संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता

मूळ सही (शिक्क्याची नाही)
संचालक,
नियोजन विकास मंडळ